गुरूवार दि.५ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३६९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## शेतकऱ्यांना राज्य सरकारचा मोठा दिलासा

# पिक विमा कंपन्यांना ७२ तासांत माहितीसाठी ऑफलाईन सुविधा देण्याच्या सूचना-धनंजय मुंडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

परभणी (वृत्तसंस्था)

मराठवाड्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परभणी जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी देखील संवाद साधला. तसेच ७२ तासाच्या आत पिक विमा कंपन्यांना माहिती देण्यासाठी ऑफलाईन सुविधा देण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या असल्याची माहिती देखील त्यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

या संदर्भात कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले की, ७२ तासांत पंचनामे नाही, तर केवळ माहिती देणे हे कायद्याने बंधनकारक आहे. असे असले तरी सध्याच्या परिस्थितीला अनुसरून अतिवृष्टीमुळे आज वीज पुरवठा खंडित झालेला आहे. तसेच ठिकठिकाणी नेटवर्क चालत नाही. त्यामुळे मोबाईल वरून देखील माहिती देता येत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कालच संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तांना तसेच हिंगोली, परभणी, नांदेड यांच्यासह सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ कंपन्यांना आदेश काढून ऑफलाईन सुद्धा माहिती देण्याची सुविधा देण्याची सूचना केली आहे. कृषी विभागाच्या कृषी सहाय्यक आणि मंडळ अधिकाऱ्यांना देखील तातडीने ऑफलाइन ७२ तासाच्या आत माहिती घेण्याचे आदेश दिले असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

परळी वैद्यनाथ शहरातील सरस्वती नदीला मागील दोन-तीन दिवसात आलेल्या पुरामुळे ठिकठिकाणी घरात पाणी शिरल्याने नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागले. याठिकाणी आज भेटी देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. नागरिकांना तातडीची मदत, धान्य आदी बाबींची तात्काळ व्यवस्था करण्यासह झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनास केल्या असल्याची माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे. स्वच्छता अभियान व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना नगर परिषद प्रशासनास केल्या असल्याचेही मुंडे यांनी म्हटले आहे.



# अतिवृष्टीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी

## काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा | विशाल घंटे



लोहा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार यांनी लोहा तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुढे निवेदनात असे नमूद केले की, लोहा तालुक्यातील सर्व मंडळातील व गोदावरी नदी पट्ट्यातील भागात दि.१ ते ३ सप्टेंबर दरम्यान ढगफुटी होऊन अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.

तेव्हा यांचे तात्काळ पंचनामे करून लोहा शेतकऱ्यांना ५० हजार रुपये आर्थिक अनुदान द्यावे अशी मागणी काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, जिल्हा उपाध्यक्ष भास्करराव पाटील जोमेगावकर, तालुका उपाध्यक्ष प्रकाश मोरे, अकबर सय्यद,डी.एन.कांबळे,चांद पटेल, सेवा दलाचे उध्दव पाटील, माधव पाटील कदम,सतीश पाटील गोलेगावकर, संतोष पाटील नांदगावकर,जिलानी भाई रायवाडीकर, दिगांबर मेकाले, अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.

# मुस्लिम समाजाविषयी वादग्रस्त विधान करणाऱ्या आ.निलेश राणेवर कारवाई करा

## पाटोदा सकल मुस्लिम समाजाची निवेदनाद्वारे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा | प्रतिनिधी

आमदार निलेश राणे यांची जीभ पुन्हा घसरली असुन मुस्लिम समाजा विषयी त्यांनी केलेल्या वक्तव्यावरून त्यांच्या वर कारवाई करण्याची मागणी होत असुन, पाटोदा मुस्लिम सकल समाजाच्या वतीने पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार यांच्या मार्फत महाराष्ट्र शासनाला आ.निलेश राणेवर तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली आहे. पाटोदा मुस्लिम सकल समाजाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भाजपा आमदार निलेश राणे हा नेहमी मुस्लीम समाजा बाबत नकारात्मक विधाने करीत आहे.



दिनांक ०१/०९/२०२४ रोजी अहमदनगर येथे मुस्लिम समाजाच्या प्रेषितांच्या विरोधात वादग्रस्त वक्तव्य करणारे रामगिरी महाराजांच्या समर्थनात आयोजित बैठकीत आ.निलेश राणे यांनी मुस्लीमांना मस्जीद मध्ये घुसून मारू असे वादग्रस्त विधान केले असुन तसेच आ.निलेश राणे हे नेहमीच मुस्लिम समाजाच्या विरोधात वादग्रस्त व चिथावणीखोर वक्तव्य करत असतो. त्याचे विधानसभा समोर ठेवून हिंदु मुस्लीम दंगे घडवाण्याचे नियोजन दिसून येत आहे. तरी आ.निलेश राणे व त्यांच्या कुटुंबीयांचा बंदोबस्त पोलीस प्रशासन व महाराष्ट्र शासनाने करावा. नसता पाटोदा शहर मुस्लिम समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे म्हटले आहे. या निवेदनावर मोसिन शेख, जावेद शेख, मोहीद शेख, हमीदखान पठाण, भाई विष्णुपंत घोलप, वाजेद कुरेशी, आकिब शेख, शेख अराफत, असलम पठाण, माजेद पटेल, आयुब पठाण, शेख जमील, सय्यद लतिफ, शेख मसरूद्दीन, शेख खलिल, शेख सुलेमान सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून संपात सहभागी न होणाऱ्या

# पाटोदा आगारातील कर्मचारी मिसाळ आणि मुळे यांचे काम कौतुकास्पद-डॉ.गणेश ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड | विजय रोडे



राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी अचानकपणे राज्यव्यापी संप पुकारत कामकाज बंद केले आहे.बीडसह राज्य राज्यभरातील बसेस दिवसभर जागच्याजागीच थांबल्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.बीड जिल्ह्यातील सर्वंच आगारातील कर्मचारी सहभागी झाले असल्याने जिल्ह्यातील ८१२ फे-या रद्द करण्यात आल्या आहेत.याचवेळी पाटोदा आगारातील वाहक मिसाळ जी.एम.आणि चालक सुभाष मुळे यांनी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी एसटी वाहतूक सुरुच ठेवली असुन त्यांच्यावर सर्वस्तरातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.

काल पासुन सुरु असलेल्या राज्य व्यापी एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपात आम्ही जरी सहभागी असलो तरी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक विद्यालयातील जवळपास २५० विद्यार्थ्यांना आम्ही नियमित सोय करत असल्याने त्यांचे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी आम्ही मसेवाडी ,पिंपरनई , पोखरी , सोमनाथवाडी, महाजनवाडी गावातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून कालपासूनच कामावर आहोत.असे पाटोदा आगारातील वाहक मिसाळ जी.एम.आणि चालक सुभाष मुळे यांनी सांगितले.एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू असल्याने संपाच्या कालावधीत प्रवास वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी खाजगी प्रवासी बसेस,स्कुल बसेस, कंपनीच्या मालकीच्या बसेस व मालवाहु वाहतूक करण्यास गृहविभागाने परीवहन विभागाला दिली असली तरी खाजगी वाहतूक करणारांकडुन गोरगरीब प्रवाशांची आर्थिक लुट केली जात असताना ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी उचललेले पाऊल कौतुकास्पद आहे.

# पर्युषण महापर्वानिर्मित निघाली लोणार शहरात शोभायात्रा



लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार | विनायक कुटे

पर्युषण महापर्वामध्ये महावीर जन्मकल्याणक वाचनाला महत्त्व असते. शहरात चातुर्मासार्थ आलेल्या प. पु. साध्वी श्री प्रियस्मिता श्रीजी ,प. पु. साध्वी श्री डॉ प्रियलता श्रीजी,प. पु. साध्वीश्री प्रियदर्शना श्रीजी म. सा. तथा प. पु. साध्वी श्री अमितसुधाश्रीजी म. सा.यांच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत.

जैन धर्मीयांच्या पर्युषण महापर्वाच्या पाचव्या दिवशी भगवान महावीरांच्या जन्मकल्याणकाचे वाचन करण्यात येते.भगवंतांनी एकूण २७ वेळा मानवजन्म धारण केले. त्यापैकी, एक जन्म हा पर्युषण महापर्वाच्या पाचव्या दिवशी येतो.त्यामुळे, पाचव्या दिवशी त्यांचा जन्मकल्याणक साजरा करण्यात येतो. यानिमित जैन साध्वीजींच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. आज वार बुधवारी , भगवंतांच्या जन्माप्रीत्यर्थ प्रातिनिधिक स्वरूपात छोटा सजवलेला पाळणा तयार करून, त्यात भगवान स्वरूपात श्रीफळ ठेवण्यात आले.जैन समाजाचे ३१ ऑगस्ट पासून आठ दिवसीय पर्युषण पर्व सुरू आहे. या आठ दिवसात जैन समाजाचे लहानात लहान आणि मोठ्यात मोठा व्यक्ती सुद्धा तन मन धनाने सहभागी होतो. सकाळी सहा वाजेपासून धार्मिक कार्य सुरू होतात. तर ९ वाजता प्रवचन दुपारी पूजा, कल्पसूत्र वाचन तथा लहान मुलांना धार्मिक कार्यक्रम, संध्याकाळी ७ वाजता प्रतिक्रमण तसेच 'भक्ती संध्या अशा प्रकारे संपूर्ण आठ दिवसाची दिनचर्या असते. या पर्वानिमित्त ०४ सप्टेबर रोजी शहरातून भव्य शोभा यात्रा काढण्यात आली. जैन समाजात तपस्या करण्याला खूप महत्त्व आहे.

सध्या महापर्व सुरू असल्यामुळे तपस्या करणे सुरू आहे. आज बुधवारला कल्पसूत्र वाचन दरम्यान भगवान महावीरांचा जन्मोत्सव येत असल्या कारणास्तव जन्मोत्सव साजराकरण्यात आला. दुपारी १ वाजता जैन मंदिरापासून रथात भगवान महावीर यांची प्रतिमा ठेवून शोभा यात्रा काढण्यात आली. ही शोभा यात्रा प्रताप चौक, सराफा लाईन मार्गे आनंद मंगल भवन येथे शोभा यात्रेचा समारोप करण्यात आला. 'भगवान महावीरांचा जन्मोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. दरम्यान रथाला ओढण्याचे काम जेष्ठानी,मुलांनी व महिलांनी केले. या आठ दिवसात जैन बांधव रात्री 'भोजन त्याग, लिलोत्री त्याग तसेच जास्तीत जास्त धार्मिक कार्यात आपला वेळ घालवतात. पर्युषण पर्वाचे महत्त्व म्हणजे मागील वर्षभरात केलेल्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष केल्या गेलेल्या चुकांची माफी मागणे व माफ करणे हाच खरा उपदेश आहे.

झाडे लावा झाडे जगवा



## चारोळी

स्वतःच्या जगण्याचं सूत्र असावं
दोर कशास मग दुसऱ्याच्या हाती?
शिकत रहावं नवीन काही
मग पेटतील मनी विचारांच्या वाती.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# श्री रामराज्य गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क

चारठाणा | प्रतिनिधी

प्रभू रामचंद्र यांच्या आशीर्वादाने चारठाणा गावांमध्ये २०२२ मध्ये रामराज्य गणेश मंडळाची स्थापना केली होती. त्याच अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राम राज्य गणेश मंडळाची सर्व सदस्य यांनी कार्यकारिणी जाहीर केली.

या कार्यकारणीत मंडळाचे अध्यक्षस्थानी राज भादलकर तर उपाध्यक्ष श्रीपाद जोशी सचिव पदावर श्रीपाद देशपांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. रामराज्य गणेश मित्र मंडळाचे सदस्य





सोमनाथ बोकन आदित्य गजमल ऋषिकेश थोरात शंतनु देशपांडे अनिकेत स्वामी अमोल बोबडे शिवम भाग्यवंत गिरीश जोशी साहील लोखंडे किरण बोकन महादेव गजमल किरण खाडे अनिल देशपांडे शिवा बरबिंडे मोहन आव्हाड शुभम चोकानफळे गोपाल नाईक नितीन काळे मनीष जोशी अमोल काळे किरण काळे शिवराज मुंजे अनिल पवार नरहरी बोकन महेश गजमल गजानन नवनाथ बरबिंडे सिद्धेश्वर घाटूळ गजानन पत्की आदि.पेठ विभागातील येडोबा मारुती मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे या श्री राम राज्य गणेश मित्र मंडळाच्या वतीने गणेश उत्सव साजरा करण्यात येणार आहे या उत्सवासाठी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्षासह सर्व सदस्यांनी केले आहे.

# शिक्षक आणि सद्यस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**


गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा: गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः गुरुला साक्षात परब्रम्ह मानणारी आपली संस्कृती आहे . गुरु म्हणजे आपल्याला अंधाराकडून प्रकाशापर्यंत नेणारा मार्ग पथ. गुरु - शिष्य अर्थात शिक्षक - विद्यार्थी यांना आपल्या संस्कृतीमध्ये अन्यन्य साधारण महत्त्व आहे. गुरुदक्षिणा म्हणून आपल्या उजव्या हाताचा अंगठा गुरुवर्यास अर्पण करणारे एकलव्यासारखे शिष्यही आपणास माहित आहेतच. पण सद्यस्थिती पाहता मनाला खेद झाल्याशिवाय राहत नाही. गुरु-शिष्याचे हे नाते कुठेतरी लुप्त होताना आपणास दिसत आहे .ज्या शिक्षकांनी आपणास घडवलं , उभं राहायला शिकवलं , जीवनात संघर्ष करायला शिकवलं त्या शिक्षकांना कधी कधी समाजात अपमानाला सामोरे जावे लागते. या कारणांचा शोधा घ्यायला हवा. याउलट सत्य परिस्थिती ही काही वेगळीच आहे ,जे शिक्षक समाज घडवू शकतात, समाजात परिवर्तन घडवू शकतात, नवक्रांती करू शकतात त्यांच्यातच आता परिवर्तन आणण्याची गरज भासू लागली आहे . बदलापूरची घटना असेल, कोलकत्याची घटना असेल अशा घटनांमुळे शिक्षकांवरचा समाजाचा विश्वासच उडाला आहे. शाळेत स्त्री सुरक्षा समिती, सखी सुरक्षा समिती स्थापन करण्याची गरज भासत आहे . परिस्थिती किती वाईट झाली ?याची कारणे आपण शोधली पाहिजे .नेमकं चुकतंय कोण? पालक, शिक्षक की विद्यार्थी ?प्रश्न संभ्रमितच आहे. शिक्षक हा समाजाचा मूलभूत आधार आहे. शिक्षणाने समाजात क्रांती होते आणि ती क्रांती घडवण्याचे कार्य शिक्षक करत असतो . पण अशा तांदळातल्या खड्यासारख्या शिक्षकांमुळे समाजाचा आदर्श शिक्षकांवरचा विश्वास उडाला आहे. दोष द्यायचा कुणाला? याचा विचार करण्याची वेळ आता नाही. तांदूळ निवडताना जसे त्यातले खडे बाजूला करतो तसे अशा विकृताना आपणासच बाजूला करावे लागेल. अन्यथा शिक्षक - विद्यार्थी हे नाते संपुष्टात यायला वेळ लागणार नाही. गरीब, हुशार , होतकरू विद्यार्थ्यांच्या जीवनातले असंख्य अडथळे स्वबळावर दूर करणारे शिक्षक आजही समाजात आहेत. तन-मन-धनाने अध्यापनाचे कार्य करणारे शिक्षकही आहेत. अशा शिक्षकांमुळे आजही समाज घडतोय आणि पुढेही घडत राहील. शिक्षकांनीही कर्म हीच सेवा मानत आजन्म शिक्षणाचा वसा आणि वारसा पुढे चालवावा . शिक्षक हा देखील आजन्म विद्यार्थी असतो . स्वतःला विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून परिपूर्ण बनवण्याचा प्रयत्न करावा आणि हे तेव्हाच होऊ शकेल जेव्हा शिक्षक स्वतः विद्यार्थी बनून राहतील. शाळेत येणाऱ्या असंख्य



विद्यार्थ्यांचे आपण आदर्श असतो त्यांचा आदर्श कायमस्वरूपी आदर्शच रहावा यासाठी प्रत्येक शिक्षकाने प्रयत्न करायला हवे. शिक्षणाबरोबरच नीती-मूल्यांची शिकवण रुजवणूक मुलांच्या मनावर बिंबवायची असेल तर स्वतःला त्या पदापर्यंत पोहोचवायला हवं . शिस्त, क्षमता आणि कर्तव्य या त्रिगुणात्मक त्रिकोणा बरोबरच समभाव, नीतिमत्ता या दोन कोनास त्यास जोडून त्रिकोणाचा पंचकोन करण्याचा प्रयत्न करायला काय हरकत आहे ? स्वतःच्या वैयक्तिक आयुष्याचा आनंद घेत, वैयक्तिक आयुष्य सांभाळत विद्यार्थ्यांमधली एक एक सदगुणांची कळी फुलवून त्यांच कळी चे फुलांमध्ये रूपांतर करण्याची क्षमता फक्त शिक्षकांमध्येच असते . मग फुललेल्या फुलांचा बगीचा म्हणजे शाळा . ते पाहण्यातच शिक्षकांचे संपूर्ण आयुष्य जातं आणि मग येतो तो निवृत्तीचा दिवस . स्वकष्टाने , घामाने, विविध अनुभवाने फुलवलेल्या बागेला सोडून जाण्याचा तो दिवस . खरंतर हा दिवस आपल्या आयुष्यात येऊच नये असं त्या शिक्षकाला वाटत असतं . पण नियम कोण मोडणार? निवृत्त तर व्हावेच लागेल ना ! सुखी , समाधानी, निष्कलंक निवृत्त होणारा शिक्षक आणि त्याने फुलवलेले असंख्य सुगंधित फुले हीच त्यांच्या आयुष्याची शिदोरी होईल . अशी शिदोरी मिळवणाऱ्या असंख्य शिक्षकांना शिक्षक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. कारण तुमच्यामुळेच आम्ही घडलोय आणि आणि एक सुगंधी फुल बनवून तुमचा वसा आणि वारसा चालवतोय. तुम्ही दिलेल्या सदगुणांचे धडे पुढच्या पिढीत परावर्तित करण्याचा प्रयत्न करतोय. शिक्षक - विद्यार्थी आदर्श नाते आयुष्यभर सांभाळतोय . शिक्षक कधीच निवृत्त होत नसतात , शरीर निवृत्त होतं पण शिक्षकाने दिलेली शिकवण पिढ्यानपिढ्या चालत असते. अशी शिकवण देणाऱ्या प्रत्येक शिक्षकाला शिक्षक दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा........!

**शब्दप्रतिभा - सौ. लक्ष्मी विठ्ठलराव पांडागळे- नांदेडे**

## आदर्श गुरुजी दीपस्तंभ



लोकनेता न्यूज नेटवर्क

आदर्श गुरुजी । स्वभाव तो नम्र ।
सर्वांशी विनम्र । वर्तणूक ।। १ ।।
विद्या मंदिरात । शिक्षक हाडाचे ।
दातृत्व गुणांचे । विद्यादानी ।। २ ।।
ज्ञान मंदिरात । आदर्श शिक्षक ।
तेजस्वी रक्षक । संस्कृतीचे ।। ३ ।।
आदर्श गुरुजी । करती वर्तन ।
स्वमुलासमान । विद्यार्थ्यांशी ।। ४।।
शुद्ध विचारांचे । शुद्धलेखनाचे ।
धडे गुरुजींचे । विद्यार्थ्यांना ।। ५ ।।
आदर्श गुरुंचे । फलक लेखन ।
घई आकर्षून । विद्यार्थ्यांना ।। ६ ।।
आदर्श गुरुजी । पूजक तत्त्वांचे ।
विद्यार्थी सत्वांचे । दीपस्तंभ ।। ७ ।।
आदर्श गुरुंना । करितो प्रणाम ।
माझा हा सलाम । गुरुजींना ।। ८ ।।

**डॉ.हरिवंशराय बच्चन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अभंगकार**
**- प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले, रुक्मिणी नगर ,अमरावती.**

# महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या आदेशाला शेळके कंट्रक्शन वासुंदे कडून केराची टोपली

## महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचा क्रेशर बंदचा आदेश तरीही क्रेशर चालूच


■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**दौंड । बबनराव धायतोंडे**

वासुंदे ता.दौंड येथे एकूण १८ खडी क्रेशर चालू असून या ठिकाणी अतिशय अंदा-धुंद कारभार खडी क्रेशर मालकांचा चालू आहे. हजारो-लाखो ब्रास खडी, कच,मोठ्या खोल प्रमाणात उत्खनन करून नियमांची पायमल्ली करत वाहतूक करून विक्री केली जात आहे.

या ठिकाणी कमी प्रमाणात रॉयल्टी भरून जास्त उत्खनन केले जात आहे. असा आरोप येथील ग्रामस्थ हनुमंत जांबले यांनी केला आहे.तसे लेखी निवेदन महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि जिल्हाधिकारी पुणे, तहसीलदार दौंड, मंडल अधिकारी यांना दिले आहे.तरी देखील या ठिकाणी ज्यादा उत्खनन करून लाखो रुपयांची माया या ठिकाणी काही खडी क्रेशर मालकांनी कमावली आहे.तरी महसूल प्रशासन कसलीही कारवाई करत नाहीत,असा आरोप देखील जांबले यांनी केला आहे.

तसेच शेळके कंट्रक्शन यांचा खडी क्रेशर बंद करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने आदेश दिला असून तरीदेखील हा खडी क्रेशर






राज-रोस दिवसाढवळ्या चालू आहे.याकडे महसूल प्रशासन मुद्दाम डोळेझाक करत आहे.कुठलीही कारवाई करत नाहीत,असे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशाला शेळके कंट्रक्शन यांनी केराची टोपली दाखवली आहे.या ठिकाणी काही क्रेशर च्या प्लँन्ट वरून अतिउच्च दाब २२० के,व्ही बारामती ते कुरकुंभ आणि २२० के,व्ही कुरकुंभ ते शिर्सुफळ विज वाहिनी गेलेली आहे.या विज वाहिनीच्या क्रमांक १ ते २ , ३५ मिटर पृष्ठभागालगत कोणतेही काम,उत्खनन करण्यास परवानगी नसते. तरी देखील मनोर्याच्या लगतच उत्खनन झाले आहे. आणि या विद्युत मनोऱ्याला धोका निर्माण झाला आहे.असे महापारेषाण उपकार्यकारी अभियंता बारामती यांनी देखील कळविले आहे.तरी देखील येथे मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरूच आहे. त्यामुळे येथे मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे.तशी नोटीस महापारेषाण विभाग बारामती यांनी संबंधित खडी क्रेशर मालकाला दिली असून देखील हा क्रेशर अजूनही चालूच आहे. आणि येथे मोठे बोर ब्लास्टिंग देखील केले जात आहे. असे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. म्हणून याठीकाणी मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण- घेवाण झाल्याचा आरोप होत आहे.

यासंदर्भात महापारेषण चे उपकार्यकारी अभियंता अनिल माळी यांना संपर्क केला असता ते म्हणाले की आम्ही तहसीलदार दौंड, महावितरण दौंड आणि संबंधितांना नोटीस दिली असून यांना देखील खडी क्रेशर चे बाबतीत तात्काळ योग्य ती कारवाई करण्याचे लेखी कळविले आहे.परंतु याला कोणीच गांभीर्याने घेत नाही,असे ते म्हणाले.

तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पुणे येथील लंगोटे यांना विचारले असता ते म्हणाले की संबंधित खडी क्रेशर बंद करण्याचे आदेश दिले आहे.जर हा खडी क्रेशर चालू असेल तर त्यांच्यावर वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन पुढील योग्य ती कारवाई केली जाईल. या बाबत तहसीलदार अरूण शेलार दौंड यांना विचारले असता ते म्हणाले चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल.

# ध्येयवेड्या गुरुजींची प्रेरणादायी यशोगाथा









■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव । प्रतिनिधी**

ही गोष्ट आहे पुणे जिल्ह्यातील पिंपरी दुमाला ता.शिरूर या छोट्याशा गावातील जिल्हा परिषद शाळेची. दळणवळण सुविधांबाबत आजही वंचित असणारे हे आडबाजूचे गाव,परंतु येथील जिल्हा परिषद शाळेचा लौकिक मात्र सर्वदूर पसरला आहे. याला कारण आहे इथे कार्यरत राहुल चातुर व कांताराम शिंदे या दोन शिक्षकांनी गावकऱ्यांच्या मदतीने उजाड खडकाळ डोंगर उतारावर फुलवलेले ज्ञानाचे मंदिर !

पूर्णपणे मोडकळीस आलेली व डोंगर उतारावरील खडकाळ जमिनीवर तग धरून असलेली इमारत व आजूबाजूचा उजाड परिसर याचे रूपांतर आकर्षक,सुसज्ज अशा इमारतीमध्ये व सुंदर हिरव्यागार परिसरामध्ये करण्याचे काम या दोन शिक्षकांनी स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने केले आहे. सुमारे वीस गुंठे क्षेत्रफळ असलेला हा परिसर आता शांतिनिकेतन या नावाने ओळखला जात आहे. पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेल्या या गावातील पालकांना शिक्षकांनी विश्वासात घेऊन शाळेच्या कायापालटास सुरुवात केली. मोडकळीस आलेल्या इमारतीचा जीर्णोद्धार करून नव्याने दोन खोल्यांचे बांधकाम केले. सर्व वर्गांसाठी स्वतंत्र खोली,ग्रंथालय,संगणक कक्ष,कार्यालय यांची देखील निर्मिती करण्यात आली. शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण परिसराला संरक्षक भिंत बांधून प्रवेशद्वार उभारण्यात आले आहे. यासाठी परिसरातील कंपन्यांचा सीएसआर निधी प्राप्त करण्यात ग्रामस्थांना यश आले. अत्याधुनिक पद्धतीचे स्वयंपाक गृह,सर्वसुविधा युक्त शौचालय व पोषण आहारासाठी स्वतंत्र हॉल बनवणे यासाठी स्थानिक ग्रामपंचायत,गावातील दानशूर व्यक्ती व पालकांनी अनमोल असे योगदान दिले आहे.

विद्यार्थ्यांच्या कलाक्रीडा गुणांचा विकास होण्यासाठी शालेय आवारामध्ये सांस्कृतिक व्यासपीठ, खेळणी युक्त बगीचा व कार्यानुभव कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. मध्यान्ह पोषण आहारासाठी शाळेमध्येच पालेभाज्या तयार करण्यासाठी परसबाग बनवण्यात आली आहे. आज संपूर्ण परिसर सुंदर विविधरंगी फुलांनी सजला आहे. यामुळे विद्यार्थी निसर्गाकडे आकर्षित झाले आहेत. याचा परिणाम म्हणून विद्यार्थी पटसंख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली . नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि सोलर एनर्जी सिस्टीम यांसारखे प्रोजेक्ट बसवण्यात आले आहेत. शालेय आवारातील पाण्याचा एक थेंब देखील वाया जात नाही. विद्युत यंत्रणेबाबत शाळा स्वयंपूर्ण झाली आहे. झिरो एनर्जी स्कूल म्हणून शाळेला या माध्यमातून उत्पन्नाचे साधन देखील प्राप्त झाले आहे. भौतिक सुविधांसोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकासासाठी येथील शिक्षकांनी अथक मेहनत घेतली आहे. नियमित अध्यापनासोबतच सर्व वर्गांसाठी स्वतंत्र ई लर्निंग सुविधा,संगणकाचे ज्ञान या बाबींवर विशेष भर देण्यात आला आहे. विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा भौतिक व गुणात्मक विकास करण्याचे कार्य निरंतरपणे सुरू आहे. शाळेमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ अभियानाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. येथील अनेक विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय गुणवत्ता पारितोषिके प्राप्त झाली आहेत. शाळेला आजपर्यंत अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. कोरोना काळात देखील येथील शिक्षकांनी अनोख्या पद्धतीने विद्यार्थ्यांची शिक्षण प्रक्रिया सुरू ठेवली होती याबद्दल महाराष्ट्र शासनाने देखील शाळेचे कौतुक केले आहे. अनेक मान्यवर व्यक्ती, सामाजिक संस्था,अधिकारी, वृत्तपत्र माध्यम प्रतिनिधी यांनी शाळेस भेटी देऊन शिक्षकांच्या कामाचे कौतुक केले आहे. अशा या उजाड माळरानावर नंदनवन उभारण्यासाठी मुख्याध्यापक राहुल चातुर,तंत्रस्नेही शिक्षक कांताराम शिंदे यांनी सुमारे दहा वर्षे अथकपणे प्रयत्न केले आहेत.या संघर्षमय प्रवासामध्ये जिल्हा परिषद पुणे,पंचायत समिती शिरूर, ग्रामपंचायत पिंपरी दुमालाचे माजी सरपंच दिलीप खळदकर,गायत्री चिखले, मनीषा खेडकर,सरपंच महेंद्र डोळस,उपसरपंच शरद खळदकर व शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष अर्चना खळदकर,शेखर पाटेकर,सुनील सोनवणे,कल्पना खळदकर, अध्यक्ष शशिकांत चिखले, उपाध्यक्षा वर्षा खळदकर यांचे अनमोल सहकार्य लाभले आहे भविष्यामध्ये विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासावर भर देण्यासाठी येथे ध्यान मंदिराची उभारणी करण्याचा शिक्षकांचा मानस आहे. राज्यभरातील शिक्षक व संपूर्ण समाजाला प्रेरणा देणाऱ्या या शिक्षकांचे शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर कौतुक करावे तितके थोडेच आहे... या दोन्हीही गुरुजींच्या कर्तुत्वाला अन् सत्कार्याला मानाचा सलाम.

# प्रभाग एक मधील प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी न लागल्यास नगरपरिषदेस मखरे यांचा आंदोलनाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**



श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक एक मधील प्रलंबित असलेल्या कामामुळे बोरुडे वाडी ते खड्याचा नंबर या रस्त्याची दुर्दशा झाली आहे आणि या रस्त्यावर ओढ्यावर असलेला पुल कमकुवत झाल्याने पुलावरुन जाताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे.या रस्त्यावर मोठी वर्दळ असल्याने शालेय विद्यार्थी व परिसरातील नागरिकांचे रस्त्यावरून ये-जा करताना मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. त्याचप्रमाणे दत्तवाडी व लोखंडवाडी जि. प .शाळा रस्त्यालगत असल्याने या रस्त्यांवरुन वेगाने येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांमुळे शाळेतील विद्यार्थ्यांचा अपघात होऊ शकतो त्यामुळे या रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावेत.

तसेच प्रभाग क्रमांक १.मध्ये येणाऱ्या सर्वात जास्त लोकवस्ती असलेल्या दत्तवाडीत स्मशान नसल्याने पावसाळ्यात मयत झाल्यास अंत्य विधीसाठी मोठी अडचण येते . त्यामुळे याठिकाणी स्मशानभुमीची सोय करण्यात यावी. वरील सर्व मागण्यांचे निवेदन मुख्याधिकारी भगत मॅडम यांना देण्यात आले आहे. वरील सर्व मागण्यांचा दोन दिवसांत सर्वे करुन पुढील काम मार्गी लावु असे आश्वासन मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांनी दिले आहे. आमच्या मागण्या येत्या काळात लवकरात लवकर पूर्ण झाल्या नाही तर श्रीगोंदा नगर परिषदेच्या कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा बालु दादा मखरे यांनी यावेळी दिला. निवेदनावर बालू दादा मखरे, महादेव बोरुडे(चऊ),संकेत बोरुडे ,अनिल साहेब बोरुडे, भैय्या मोटे पाटील, विनायक मोटे पाटील, अनिकेत मखरे, विशाल मखरे, दादा मखरे, महादेव मखरे, अनिकेत बोरुडे ,दादा बोरुडे, मधुकर बोरुडे ,मनोज बोरुडे ,प्रशांत बोरुडे ,हर्षद मोटे पाटील ,
दीपक मखरे ,सयाजी पोटे ,रमेश मखरे, मनोहर मखरे ,कपिल मखरे ,शहाजी खराडे, प्रकाश बोरुडे ,राजू बोरुडे ,संकेत खामकर ,बंटी दादा मखरे ,रितेश मखरे , बाळू खराडे, धीरज कवडे ,भाऊसाहेब पोटे , दीपक मांडे, सचिन मखरे, शिवाजी पोटे, संदीप खराडे, सुभाष मखरे (चेअरमन), प्रकाश मखरे. यांच्या सह्या आहेत.

## सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी जयंती सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालयात उत्साहात साजरी करावी-दादा डिडुळ


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**



सर्वज्ञ चक्रधर स्वामींचे जीव उद्धारक विचार तत्त्वज्ञान मानवतावादी शिकवण सर्व जीव जातीच्या कल्याणासाठी स्वामींचे विचार सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी ०५ सप्टेंबर रोजी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन अर्थात जयंती असल्यामुळे महाराष्ट्र सरकारने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन जयंती सर्व शाळा महाविद्यालय शासकीय निमशासकीय कार्यालय आदी ठिकाणी साजरी करावी. असे परिपत्रक काढले असल्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाचे युवा नेते दादा डिडुळ यांनी स्वागत करुन सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे जीव उद्धारक विचार तत्त्वज्ञान मानवतावादी शिकवण सर्व जीव जातीच्या कल्याणासाठी स्वामींचे विचार सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी ०५ सप्टेंबरला सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन अर्थात जयंती मोठ्या उत्साहात साजरी करावी. असे आवाहन युवा नेते दादा डिडुळ यांनी केले आहे.

## सेनगाव तालुक्यातील अतिवृष्टी झालेल्या गावाची पाहणी अप्पर जिल्हा अधिकारी,शिवाजीराव मुटकुळे यांनी केली पाहणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

हिंगोली जिल्ह्यांमध्ये झालेल्या पावसाची पाहणी हिंगोली अप्पर जिल्हा अधिकारी व भाजप युवा नेते शिवाजीराव मुटकुळे सेनगाव तहसीलदार यांनी पाहणी करून सेनगाव तालुक्यातील येलदरी कवरदडी वडहिवरा या भागाची पाहणी करण्यात आली असून हिंगोली जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत असल्याने या पावसामध्ये शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन अप्पर जिल्हा अधिकारी शिवाजीराव मुटकुळे तहसीलदार मंडळ अधिकारी यांनी पाहणी केली यावेळी झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळआर्थिक मदत द्यावी अशी विनंती भाजपा युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी केले, त्याचबरोबर सेनगाव तालुक्यातील रस्त्याची पाहणी करण्यात आली असून आडोळ येथे पूल तुटल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला होता तात्काळ जेसीबीच्या साह्याने टुटलेल्या रस्त्यावर मुरूम टाकून रस्ता चालू करण्यात आला यावेळी उपस्थित हिम्मतराव राठोड ,विजय धाकतोडे ,नारायणराव , थोरात, गावातील नागरिक शेतकरी उपस्थित होते.

## नितेश राणेची आमदारकी रद्द करा-ॲड.जब्बार पठाण

**राज्यपालाकडे निवेदनाव्दारे मागणी;उठसूट बेताल वक्तव्य करून राणेंनी वातावरण बिघडवू नये**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**



महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांची देवाण घेवाण करणारे राज्य आहे, या ठिकाणी अठरा पगडा जाती, धर्म, पंथाचे लोक गुण्या गोविंदाने नांदत आहेत. मात्र आमदार नितेश राणे यांच्या सारख्या काही नेत्यांमुळे महाराष्ट्राचा सलोखा दुभंगत चालला आहे. आणि जाती जातीत तेढ निर्माण होईल अशी बेभान वादग्रस्त वक्तव्य करून आमदार नितेश राणे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांची सारखेच अशी बेताल वक्तव्य करण्याची मालिका सुरू आहे. तो सारखा सारखा मुस्लिम समाजाला केंद्र बिंदू ठेवत द्वेष पूर्ण भाषण देत असतो. त्या मुळे नितेश राणे याला कायद्याचा धाक आहे की नाही हा प्रश्न निर्माण होत आहे. रामगिरी महाराजाच्या वक्तव्याने मुस्लिम समाजात प्रचंड रोष निर्माण झालेला असताना या रामगिरी महाराजा विरुद्ध काही बोलाल तर याद राखा असे चिथावनी देणारे वक्तव्य सारखेच होत आहेत. या मुळे मुस्लिम समाजाच्या भावना वारंवार दुखावल्या जात असुन कोणत्या ना कोणत्या कारणाने नितेश राणे मुस्लिम समाजा बद्दल गरळ ओकून मुस्लिम समाजाच्या भावनांना इजा पोहोचण्याचा प्रयत्न करतो आहे. नितेश राणे यांच्या अश्या वक्तव्याने महाराष्ट्रात दोन जाती धर्मात तेढ निर्माण होत असल्याने याला वेळीच आवर घालने गरजेचे आहे, याची उंची किती आणि तो बोलतो किती याच भान या नितेश राणेला राहिले पाहिजे, नितेश राणेत हिम्मत असेल तर त्यांनी महाराष्टातील एखाद्या मशिदे मध्ये घुसून दाखवावे, लव्ह जिहाद च्या नावाखाली मोर्चे काढून तो मुस्लिम समाजावर बेताल वक्तव्य करत आहे. त्याला कोणता कायद्याची भीती नाही, तो पोलीस प्रशासनाच्या समोर गरड ओकतो आणि पोलीस फक्त बघ्याची भूमिका घेतात याच्याच जागेवर जर मुस्लिम समाजाचा एखादा पुढारी किवा कार्यकर्ता असला असता तर त्याच्या विरोधात कार्यवाही होऊन त्याला जेल मध्ये टाकले असते, त्याला कायद्याची भीती राहिलेली नाही का? असल्या वाचाळ वीराच्या विरोधात कार्यवाही झालीच पाहिजे, जेणे करून महाराष्ट्राचा सलोखा अबाधित राहण्यास मदत होईल. सर्वोच्च सभागृहामध्ये आमदारकी ची शपथ घेता ना सर्व धर्माचा आदर करील अशी शपथ घेतली असताना एका विशिष्ट जातीवर बोलून घेतलेल्या शपथेचा भंग केला असल्याने आमदार नितेश राणेची आमदारकी रद्द करावी अशी मागणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांना निवेदनाद्वारे अँड.जब्बार पठाण यांनी केली आहे .

**लाडक्या बहिणींनंतर लाडक्या भावांचीही चांदी**

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या लाभार्थ्यांना १० सप्टेंबरपर्यंत मिळणार पैसे-मंगल प्रभात लोढा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**



लाडकी बहीण योजनेनंतर लाडक्या भावांना देखील मदतीसाठी सरकारने पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या घोषणेपासून जवळपास १ लाख १० हजार प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणासाठी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहते. यापैकी ६० हजारांहून अधिक युवा खाजगी तसेच शासकीय संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी रुजू झाले आहेत. या संदर्भातील माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली आहे. मंगल प्रभात लोढा म्हणाले, आत्तापर्यंत २ लाखांपेक्षा जास्त युवकांनी या योजनेसाठी नोंदणी केली असून यातील ८ हजार १७० आस्थापनांमध्ये त्यांना काम करण्याची संधी मिळणार आहे. राज्य शासनाने दिलेल्या निर्णयानुसार जुलै आणि ऑगस्ट महिन्यात रुजू झालेल्या युवकांना डीबीटीद्वारे विद्यावेतन १० सप्टेंबरपर्यंत त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

या योजनेबाबत अधिक माहिती देताना मंगल प्रभात लोढा म्हणाले, भविष्यातील रोजगाराची आव्हाने लक्षात घेता आतापासूनच कार्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून युवकांना रोजगारक्षम बनवण्याचा निर्धार आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, या योजनेतून सरकारी तसेच खाजगी आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. या योजनेत जवळपास २ लाख २४४ युवकांनी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमुळे केवळ रोजगारच नव्हे तर उद्योगांना देखील लागणारे मनुष्यबळ उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला आहे. ही योजना वर्षभर सुरू राहणार असून यातून १० लाख युवकांना प्रशिक्षण देऊन रोजगार देण्याचे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

## अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय ओतूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर | मयूर ढोबळे**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय ओतूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संस्था वर्धापन दिनानिमित्त दिनांक ४ सप्टेंबर ते ६ सप्टेंबर या कालावधीत वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.४ सप्टेंबर रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान विभागातील वीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शिक्षण आणि पर्यावरण या विषयावरील रांगोळया जास्त लक्षवेधक होत्या. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे सर यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. आपल्या मनोगतिय भाषणामध्ये विद्यार्थ्यांनी अशा विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन आपल्या कलागुणांमध्ये वाढ करावी आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडून आणवा. असे आव्हान केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. महिंद्रा अवघडे उपप्रचार्य डॉ. के. डी. सोनावणे उपप्राचार्य डॉ. रमेश शिरसाठ, डॉ. वसंत गावडे, डॉ रमाकांत कसपटे आयक्यूसी चे समन्वयक डॉ. योगेश्वर काळदंते डॉ. हरिभाऊ बोराटे, डॉ. रमेश काशिदे, रोहिदास मेमाणे डॉ. किशोर काळदंते डॉ. रोहिणी मदने मध्ये प्रा. सुर्वे एम.ए. आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. निलेश काळे, प्रा. सुवर्णा डुंबरे, डॉ.राजेंद्र आंबवणे डॉ.अविनाश रोकडे डॉ. विनायक कुंडलिक आणि शिक्षकेतर कर्मचारी निखिल काकडे यांनी विशेष प्रयत्न केले.

## पळसदेव आणि तरंगवाडी तलावाचे हर्षवर्धन पाटील यांनी केले जल पूजन





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते खडकवासला कालव्यातील पाण्याने भरून घेण्यात आलेल्या पळसदेव व तरंगवाडी (ता. इंदापूर) येथील तलावातील पाण्याचे उत्साही वातावरणामध्ये जल पूजन बुधवारी (दि.४) करण्यात आले.

पळसदेव व तरंगवाडी परिसरातील शेतकरी व नागरिकांच्या दृष्टीने हे दोन्हीं तलाव महत्त्वाचे आहेत.या तलावाच्या पाण्यावरती अनेक गावच्या नळ पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत.त्यामुळे या तलावासह इंदापूर तालुक्यातील खडकवासला कालव्यावरील सर्व तलाव भरून घेणे संदर्भात हर्षवर्धन पाटील यांनी सातत्याने आग्रही भूमिका घेतली व पाठपुरावा केला.त्यामुळे पळसदेव व तरंगवाडी तलावांमध्ये पाणीसाठा झाल्याने हर्षवर्धन पाटील यांनी आनंद व्यक्त केला.आगामी काळातही इंदापूर तालुक्यातील शेतीला पाणी कमी पडू दिले जाणार नाही,असेही हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.या जल पुजन कार्यक्रमास पळसदेव, तरंगवाडी परिसरातील पदाधिकारी,शेतकरी, कार्यकर्ते,ग्रामस्थ व हितचिंतक उपस्थित होते. दरम्यान,हर्षवर्धन पाटील यांचे हस्ते भादलवाडी तलावातील पाण्याचे रविवारी जलपूजन करण्यात आले.

# पुरग्रस्तांना धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लायन्सच्या पाचशे डब्याचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

पुरग्रस्त भागात सलग दुसऱ्या दिवशी एनटीसी मिल परिसरातील पाणी शिरलेल्या घरांमध्ये मंगळवारी दुपारी धर्मवीर दिलीप ठाकूर,लायन्स क्लब नांदेड सेंट्रलचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील,सचिव गौरव दंडवते,कोषाध्यक्ष दिपेश छेडा, संतोष भारती, सुरेश शर्मा, विलास वाडेकर,सुरेश बाबानी यांनी नल्लागुट्टा चाळ, देगाव चाळ, मार्कंडेय मंदिर परिसरात घराघरात जाऊन जेवणाचे डबे वाटप केले. अनेक घरात गुडघ्या इतके पाणी साचले असल्यामुळे नागरिकांचे अतोनात नुकसान झाले होते. एकाही घरात अन्न शिजले नव्हते. त्यामुळे वरण भात ,भाजी चार पोळी असलेला लायन्सचा डबा मिळाल्यामुळे पूरग्रस्तांनी पोटभर जेवण केले.व्यंकटेश पंजाला, अनिल गाजूला, तुम्मा भास्कर, शिवरात्री सत्यम, एलगंटी गोविंदा, गणेश शेट्टी, नक्का किरण, बत्तीनी साई, शिवरात्री श्रीनिवास, लोकम्म मनोहर, ताल्ला रमेश यासह अनेक नागरिकांनी लायन्स परिवाराला धन्यवाद दिले.

लायन्स क्लब नांदेड सेंट्रल च्या आवाहानाला प्रतिसाद देऊन आतापर्यंत दोन हजारापेक्षा जास्त जेवणाचे डबे दानशूर नागरिकांनी दिले आहेत. नवीन नोंदणी केलेल्यामध्ये सतीश सुगनचंदजी शर्मा यांच्यातर्फे पाचशे तर सुनील साबू यांच्यातर्फे चाळीस तसेच रमाकांत भंडारे यांनी तीस डबे दिली आहेत.स्वप्निल चव्हाण,भानुदास काब्दे,रामदास बाबुराव कडतन, सुषमा हुरणे यांनी प्रत्येकी वीस डबे दिले आहेत. यापूर्वी माधव एकलारे यांनी ५००, धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर १००, बलजीतकौर रामगडिया यांनी ५० डब्यासाठी देणगी दिली आहे.प्रत्येकी ४० डबे देणाऱ्यांमध्ये ज्ञानेश्वर महाजन,शिवाजीराव पाटील, दिलीप मोदी,रवी कडगे,नरेश व्होरा,दीपेश छेडा,सुधाकर चौधरी, राजेंद्र हुरणे ,वसंत आहिरे ,शिवाजीराव शिंदे,गजानन जोशी,अजय अग्रवाल ,पवनकुमार रमेशचंद्र सारडा,अग्रवाल जिल्हा महिला मंडळ,प्रगती निलपत्रेवार,शंकरराव कामीनवार ,डॉ. अरुण हिवरेकर ,सुधीर विष्णुपुरीकर यांचा समावेश आहे. याशिवाय प्रत्येकी २० डबे पारुल जैन,अग्रवाल महिला मंडळ नांदेड शहर, सुधाकर जबडे देगलूर यांनी दिले आहे.

पूर ओसरे पर्यंत ही सेवा सुरू राहणार आहे. हा उपक्रम सुरू असेपर्यंत अन्नदात्यांची यादी सोशल मीडियावर पन्नास हजारापेक्षा जास्त लोकांपर्यंत वारंवार वायरल केली जाईल.यासाठी ज्यांना शक्य असेल त्यांनी लायन्स परिवारातील सदस्याशी संपर्क साधावा. अन्नदात्यांच्या हस्ते चार पोळी, भाजी वरण-भात असलेले ४० जेवणाचे डबे देण्यात येणार आहेत.तरी पूरग्रस्तांसाठी लायन्सचा डबा या उपक्रमामध्ये जास्तीत जास्त दानशूर नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहनलायन्स क्लब नांदेड सेंट्रल चे अध्यक्ष ला. शिवाजीराव पाटील, सचिव ला. गौरव दंडवते, कोषाध्यक्ष ला.दिपेश छेडा, प्रोजेक्ट चेअरमन ला. धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांनी केले आहे.



# आ.संजय रायमुलकर यांचा अतिवृष्टीग्रस्त भागाचा दौरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



आज दिनांक ४ सप्टेंबर रोजी लोणार तालुक्यातील टिटवी,नांद्रा मुंढे,रायगाव,सावरगाव मुंढे,देऊळगाव वायसा,गंधारी,धाड या शिवारामध्ये ढगफुटी व अवकाळी पावसामुळे प्रचंड प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे.

आज शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आमदार संजयजी रायमुलकर साहेब यांनी भेटी घेत शेतकऱ्यांना धीर दिला नदीकाठची दोन्हीबाजूची पेरलेली शेते खरडून गेली. शेतात पाणी साचल्यामुळे शेतातील माती वाहून गेली. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात बळीराजाचे नुकसान झाले आहे.पावसामुळे प्रत्यक्ष जाऊन पिकांची पाहणी केली. नुकसान झालेल्या शेतजमिनीचे सर्वेक्षण करून नुकसानग्रस्थ शेतकऱ्यांना मदत देण्यासंदर्भात सूचना केल्या यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा.बळीराम मापारी, शिवसेना तालुकाप्रमुख श्री. भगवान पाटील सुलताने, शहरप्रमुख मा.पांडुरंग सरकटे, माजी जि.प.सदस्य भगवानभाऊ कोकाटे व प्रमुख पदअधिकारी व महसूल विभागाचे श्री.रविंद्र जोगी साहेब,तहसीलदार भुषण पाटील, तालुका कृषी अधिकारी श्री.काळे साहेब,कावरके साहेब, गटविकास अधिकारी श्री.देशमुख साहेब व ग्रामसेवक,तलाठी,मंडळ अधिकारी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कारा साठी विठ्ठल हिमगिरे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । दुगाने साहेबराव**

महात्मा ज्योतिराव फुले शिक्षण परिषद महाराष्ट्र च्या वतीने दिला जाणारा सन २०२४ चा राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कारासाठी हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेतील सेवारत शिक्षक विठ्ठल नागोबा हिमगिरे यांची निवड झाली आहे. भव्य शिक्षण परिषद व पुरस्कार प्रदान सोहळा ८ सप्टेंबर २०२४ रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे संपन्न होणार असून सपत्नीक, सहकुटुंब इष्टमित्र व सहकाऱ्यांसह उपस्थित राहण्याचे आयोजकांनी आवाहन केले आहे.

परिषदेच्या वतीने दरवर्षी जिल्हास्तरीय,विभागीय,राज्यस्तरीय आणि राष्ट्रपती पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यावर्षीच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी



विद्यार्थीप्रिय,उपक्रमशील शिक्षक श्री.विठ्ठल हिमगिरे यांची त्यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी निवड करण्यात आली आहे.पुरस्कार निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष श्री.व्यंकटराव जाधव यांच्या हस्ते संबंधिताना देण्यात आलेले आहे .करिता संस्थेचे सचिव श्री.विश्वनाथराव पाटील बन्नाळीकर, अध्यक्ष श्री.राम पाटील बनाळीकर, कोषाध्यक्ष श्री.रामचंद्र पाटील बाळापूरकर , डॉ.कमल किशोर काकानी , श्री.दिनेश शेठ सारडा , श्री.नारायण शाहू सर,सर्व संचालक व विश्वस्त तसेच पानसरे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.सन्मुख बेंबरेकर , पर्यवेक्षक श्री.मोहन पूलकंठवार, श्री.नरेश जिंदमवार, मा.अधीक्षक गंगाधर नोरलावार,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापकश्री.महादप्पा मठपती व सहकारी शिक्षक व शिक्षिका भगिनी, पत्रकार बांधव यांच्याकडून त्यांच्या कार्याचा गुणगौरव होतो आहे. श्री. विठ्ठल हिमगिरे यांच्यावर धर्माबाद तालुक्याच्या सर्व स्तरावरून शुभेच्छांचा वर्षाव होतो आहे.

# मुलांचे भाव विश्व रंगवणाऱ्या रंगतदार गोष्टी-कु.शर्वरी सोमवंशी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

लहान मुलांना गोष्टी ऐकायला आणि वाचायला खूप आवडतात. यामुळे आमचे भावनिक समाधान होऊन मानसिक विश्व समृद्ध होण्यास मदत होते. असेच आमचे भाव विश्व रंगवून जीवन रंगतदार बनवणाऱ्या गोष्टीचे पुस्तक म्हणजे रंगतदार गोष्टी हे होय. असे मत कु. शर्वरी सोमवंशी हिने व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. नामदेव खंडगावे यांचे अध्यक्षतेखाली चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत संपन्न झालेल्या ३२० व्या विशेष बालवाचक संवाद मध्ये इयत्ता तिसरीत शिकत असलेली कुमारी शर्वरी अनिता अमोल सोमवंशी या विद्यार्थिनीने सी.के.संपत संपादित व अशोक बावगे अनुवादित रंगतदार गोष्टी या साहित्यकृतीवर संवाद साधला. एकूण १४ कथा असलेल्या या पुस्तकातल्या मुलांचे मानसशास्त्र व आवडीनिवडी यावर आधारित त्याचबरोबर पंचतंत्र हितोपदेश अशा संस्कार करणाऱ्या निवडक कथांवर तिने भाष्य केले. अत्यंत सहज व्यक्त झालेल्या शर्वरीने यावेळी काही कविता देखील म्हणून दाखवल्या.यानंतर झालेल्या चर्चेत सुचिता कदम, आदर्श शिक्षक गुंडप्पा पटणे, तुळशीदास




बिरादार,अनंत कदम, राजाराम बिरादार यांचेसह अनेकांनी सहभाग नोंदवला. आपल्या बुद्धी कौशल्याने तिने श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देखील दिली. शेवटी अध्यक्षीय समारोपात डॉ. खंडगावे म्हणाले की, लहान मुलांना परी, राजा- राणी, पशु-पक्षी अशा कथांचे विलक्षण आकर्षण असते. कथांमुळे मुलांचे भावनिक समाधान होऊन त्यांचे मानसिक विश्व समृद्ध होण्यास मदत होते. अवघ्या नऊ वर्षे वयाच्या शर्वरी या लहानशा चिमुकलीने खुपच सुंदर विवेचन केल्यामुळे कौतुक ही केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजपाल पाटील यांनी केले, संवादिकेचा परिचय तिचे आजोबा बाबुराव सोमवंशी यांनी करून दिला. तर आभार मुख्याध्यापक संजय जाधव यांनी मानले

# ओला दुष्काळ जाहीर करुन सरसकट शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या-प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा-कंधार तालुक्यात अतिवृष्टीमुळे ३ दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे खरीपांच्या पिकाचे मोठे नुकसान झाले असून कापूस,हळद,तूर,ज्वारी, मुग,उडीद,भाजीपाला या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.शेतीचे तात्काळ पंचनामे करुन कंधार,लोहा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन सरसगट शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांनी कंधार तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली आहे.



लोहा कंधार तालुक्यात अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे जमिनी पाण्याखाली गेल्याने हाताला पीक गेल्यामुळे शेतकरी अस्मानी संकटात सापडला आहे.७२ तासांमध्ये झालेल्या नुकसानीची ऑनलाईन नोंद करण्याचे प्रशासन सांगत आहे.पण ऑनलाईन साईट चालत नसल्याने शेतकरी हातबल होत आहेत.ही जाचक अट रद्द करून सरसकट पंचनामे करून दोन्ही तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. २०२३ वर्षातील पिकांची आणेवारी ५० टक्के च्या आत असूनही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना मागील वर्षाचा पिकविमा मिळाला नाही. नांदेड जिल्ह्यात लोहा,कंधार तालुका वगळता सर्व तालुक्यांना पिकविमा मिळाला पण या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्याला पिकविमा मिळाला नसल्याने या शेतकऱ्यावर अन्याय झाला आहे.शासनाने मागील वर्षाचा २०२३ चा पिकविम्यासह या वर्षाचा पिकविमा व नुकसान भरपाई त्वरित देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून अशी मागणी केली आहे निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री,महसूल मंत्री,जिल्हाधिकारी नांदेड,जिल्हा कृषी अधिकारी नांदेड,कंधार उप विभागीय कार्यालय यांना देण्यात आल्या आहेत.

निवेदनावर बाबाराव पा.शिंदे,कटीराम पा.कदम,भीमराव वंजे,पंडितराव पेठकर, माधवराव पिकविमा मिळाला पण या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्याला पिकविमा मिळाला नसल्याने या शेतकऱ्यावर अन्याय झाला आहे.शासनाने मागील वर्षाचा २०२३ चा पिकविम्यासह या वर्षाचा पिकविमा व नुकसान भरपाई त्वरित देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून अशी मागणी केली आहे निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री,महसूल मंत्री,जिल्हाधिकारी नांदेड,जिल्हा कृषी अधिकारी नांदेड,कंधार उप विभागीय कार्यालय यांना देण्यात आल्या आहेत.

निवेदनावर बाबाराव पा.शिंदे,कटीराम पा.कदम,भीमराव वंजे,पंडितराव पेठकर, माधवराव पेठकर,माधव भालेराव,उद्धव पाटील लाडेकर,सरपंच आत्माराम पा.लाडेकर,राजीव पाटील डफडे,विठ्ठल डफडे,आकाश डफडे,माधव लुंगारे,राजीव लुंगारे शिवाजी पा.भुत्ते,हनमंत आनकाडे,शामराव गायकवाड,विलास सांगवे,विठ्ठल भुत्ते,राजू तोरणे, ऋषिकेश तोरणे,विकास गायकवाड,आधिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण





**विहाराची वैशिष्ट्ये**

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झालेले उदगीर येथील विहार कर्नाटक येथील कलबुर्गीच्या बुद्ध विहाराची प्रतिकृती आहे. एक हेक्टर १५ आर जागेवर या विहाराची उभारणी करण्यात आली आहे. विहारात १२०० अनुयायांची बैठक व्यवस्था असलेले ध्यान केंद्र तयार करण्यात आले आहे. विहार परिसरात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य प्रवेशद्वार तयार करण्यात आले आहे. या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधील सांची स्तूपाप्रमाणे करण्यात आली आहे.**

लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते आज लोकार्पण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, विशेष अतिथी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, रमेश कराड, अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचीही उपस्थिती होती.

सुरूवातीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याहस्ते कोनशिलेचे अनावरण, फीत कापून विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती यांनी विहारातील गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना झाली. वंदनेनंतर उपस्थित बौद्ध भिक्कूंना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू चिवर दान केले. बौद्ध भिक्कू यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गौतम बुद्धांची मूर्ती भेट दिली. क्रीडा मंत्री बनसोडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904